# <u>परिशिष्ट ‘के’</u>

## <u>'प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना'</u>

(१) वाटपपत्रावर नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत उमेदवार तात्पुरते प्रवेश वाटप पत्र (Provisional Allotment Letter) घेऊन आल्यानंतर, वाटप पत्रामध्ये नमूद केलेला उमेदवाराचा प्रवर्ग, गुण, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला इत्यादिविषयक सर्व मूळ कागदपत्रे तपासावीत.

(२) (अ) आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्यास उमेदवाराकडून नियमानुसार शुल्क भरुन प्रवेशाची नोंदणी करावी.

(ब) महाविद्यालयाच्या ‘लॉग इन’द्वारे संकेतस्थळावर प्रवेश दिल्याची नोंद करून 'केटीपीएल'कडे कळवावे.

(क) **ज्या उमेदवारांसंदर्भात शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांकडून संबंधित शुल्क वसूल करू नये.**

(३) प्रवेशाची नोंदणी झाल्यानंतर विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करावयाचा असल्यास प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१९ येथे नमूद केलेल्या पध्दतीने कार्यपध्दती अवलंबावी आणि महाविद्यालयाच्या ‘लॉग इन’द्वारे नोंद करून 'केटीपीएल'ला आणि फॅक्सद्वारे संचालक (शिक्षण), कृषी परिषद यांना कळवावे.

(४) प्रवेश देतेवेळी उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करू न शकल्यास अशा उमेदवाराचे प्रवेश वाटप फेटाळण्यात (Reject) यावे आणि लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून प्रवेश वाटप फेटाळण्याचे कारण संकेतस्थळावर नमूद करण्यात यावे.

(५) प्रवेश फे-या सुरु झाल्यानंतर किमान पाच महिन्यांपर्यंत सर्व महाविद्यालयांनी लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करत रहावी.

(६) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकृत पत्रासोबत संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र, तात्पुरते वाटपपत्र, आवश्यक ती मूळ कागदपत्रे व योग्य ते शुल्क सादर केल्यास उमेदवारास त्याच्या गैरहजेरीत प्रवेश देण्यात यावा. ही बाब, जागेवरील प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

**(७)**ज्या विद्यार्थ्याकडून स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दानविषयक परिशिष्ट ‘क्यु’ येथील <u>‘मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज’</u> प्राप्त होईल, अशा विद्यार्थ्यास महाविद्यालयाकडून देण्यात येणाऱ्या ओळखपत्रावर ‘अवयवदाता’ अशी नोंद करावी.

(८) ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी उमेदवाराकडून हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून घेऊन शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार कार्यवाही करावी.